# तमाशा – रंजनपर विधीमुक्त लोककला

प्रा. विनायक राऊत, मराठी विभाग, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,मो. 9021769256

**प्रस्तावना:** महाराष्ट्रामध्ये गोंधळी, वाघ्यामुरळी, दशावतारी, दंडारी, भारूडी, पोतराज, पांगूळ, भराडी या लोकसंस्कृतिच्या उपासकांनी लोकधर्माचा जागर घालण्यासाठी कार्य केलेच पण त्यासोबतच मराठी लोकरंगभूमीच्या विकासाच्या पाउलखुणा निश्चित करण्याचे कार्यही केले. या उपासकांना आविष्कारासाठी आधुनिक रंगभूमीच्या सेवा उपलब्ध नसल्या तरी त्यांचे काही अडत नव्हते. रंगभूमी, पडदे, विद्युत प्रकाश रंगभूषा इत्यादीची आवश्यकता या कलाविष्काराला नव्हती व नाही नेहमिच्या पारंपरिक पोशाखातच हा कालाविष्कार होत असतो. निवेदनातून नेपथ्याचे कार्य होते. या भगतांचा एकूणच कलाविष्कार म्हणजे नाटयाचा प्रयोग असतो. नृत्य, संगीत, गीत, कथा, संवाद त्यांच्या एकत्रित आविष्कारातून हा प्रयोग सिध्द होत असतो.

सामान्यतः कोणत्याही पारंपरिक नाटयविधांसाठी 'लोकनाटय' हा शब्द सैलसर अर्थाने वापरला जातो. परंतु सर्व विधीनाटय एकाच गटात सामावणे अयोग्य आहे. उदाहरणार्थ खंडोबाचे वा देवीचे जागरण वा गोंधळ ही विधीनाटये आहेत. तर तमाशा हे लौकिक विधीमूक्त लोकनाटय आहे. तमाशाचे आजचे स्वरूप पूर्णत मनोरंजनाधिष्टित असले तरी तमाशाच्या सुरूवातीला असणारे गण, गौळण किंवा कलगी आणि तुऱ्याचा झगडा या खुणा तमाशाला पूर्वी धार्मिकतेचे अधिष्ठान होते. याची साक्ष देतात

तमाशा हा शब्द मूळ पार्शियन भाषेतील आहे. तिथून तो उर्दुतून मराठी भाषेत येउन रूढझाला आहे. उर्दुत आणि पार्शियन भाषेत याचा अर्थ 'मौजेचे आनंद देणारे किंवा आश्चर्यजनक दृश्य' असा आहे. मराठीत मात्र 'हिणकस हिडीस देखावा' असा लाक्षणिक अर्थ त्याला आला आहे. काही लोक तमाशा या शब्दाची 'तम**+**आशा' अशी फोड करून त्याचा अर्थ ज्यात तमोगुणाची आशा लागते तो असा सांगतात.

एकनाथांच्या एका भारूडात 'बडे बडे तमासा देखे' अशी ओळ आहे. तमाशा या शब्दाचा 'उघडा देखावा' असा अर्थ आहे. तर सुप्रसिध्द शाहीर पठ्ठेबापूराव म्हणतात, 'लौकर यावे सिध्द गणेशा! आतमध्ये कीर्तन वरून तमाशा' असा भक्ती व शृगांर या दोन्हींचा समन्वय तमाशामध्ये साधला जात असे. तर वसंत सबनीसांच्या मते, 'तमाशा म्हणजे लोक मानसात रूजलेले नाटय होय'.

तमाशा पेशवाईच्या कालखंडात म्हणजे 17 व्या शतकात सिध्द झालेला असावा. महाराष्ट्राची लोककला असणाऱ्या या तमाशाचे नेमके मूळ सांगणे कठीण आहे. पण तमाशाची पूर्व चिन्हे 'गोंधळ' या विधीनाटयात दिसतात. गोंधळाप्रमाणेच तमाशात पूर्वरंग आणि उत्तररंग असे भाग असतात. पूर्वरंगात भक्तीपर पदे तर उत्तर रंगात कथा सांगितली जाते. दोन्हीत सूत्रधार असतो. गोंधळाच्या उत्तररंगातील कथेच्या संपादणीचे तंत्र आणि तमाशातील वगाची संपादणीची पध्दत सारखीच असते. शिवाय गोंधळातील टाळ, तुणतुणे, खंजिरी ही वादये तमाशातही असतात. जागरणातील मुरळीच्या नृत्याचा पदन्यास आणि डोळेमोड तमाशातील नाचीशी साम्यदर्शक असतात तर कर्नाटकी दशावतारातील पात्रांमधील विक्षिप्तता तमाशातील गौळण, बतावणी, वग या घटकांमध्ये आढळते. हीच विक्षिप्तता बहुरूपी खेळातही आढळते. बहुरूपी खेळातील मेकबिलव्हचे तंत्र तमाशातही असते. महाराष्ट्रात पूर्वी प्रचलित असलेल्या भेदिक कलगी–तुरा, फड आणि तमाशात इतके साम्य आहे की, या भेदिक कलगी फडातूनच तमाशा निर्माण झाला असावा असे वाटते. या भेदिक कलगी–तुरा, फडाप्रमाणेच तमाशातही सवाल जवाब असत. दोन्हीतील गणाच्या रचनेत साम्य आहे. अनेक नामवंत तमासगीर भेदक रचना करीत आणि त्या रचना तमाशाच्या बोर्डावर सादरही होत. भेदीक फडात सादर होणाऱ्या ऐकिवात आणि तमाशातील वगात प्रचंड साम्य आहे. या भेदिक फडातील ऐकिवातून म्हणजे कथात्मक लावणीतून वगाचा जन्म झाला असावा.

उपरोक्त सर्व लोककला प्रकारातील रंजनमूल्यांचा स्वीकार करून त्यातील काही वैशिष्टये, लकबी, गुण तमाशाने स्वीकारले आणि स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला. तमाशाने रंजनमूल्य अधिक उचलल्याने त्याला लौकिक किंवा विधिमुक्त लोकनाटयाचे स्वरूप प्राप्त झाले. तमाशा ही महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेली पोसलेली व विकसित झालेली लोककला मानण्यात येते. अर्थात या कलेला एकसंघ आणि सूत्रबध्द स्वरूप प्राप्त होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी जावा लागला. पेशवाईत दुसऱ्या रावबाजींच्या काळात तमाशाने प्रचंड लोकप्रियता प्राप्त केली तमाशाची अंगे खुलून दिसू लागली पूर्ण विकसित झाली ती अंगे पुढीलप्रमाणे.

**गण**– तमाशाची सुरूवात गणाने म्हणजेच गणपतीला आवाहन करून होते. अर्थर्वशीर्षात 'गं' काराची उपासना आहे. ज्ञानेश्वरांनी या 'गं' काराला व्यवहारी भाषेत गण असे नाव देवून त्याला ईश आदी अशा शब्दांनी 'भावार्थदिपिकेत' नमन केले आहे. शाहिरांनी 'गण' हा शब्द तसाच ठेवला आणि 'गणापूत झाली सारी उत्पत्ती' असे म्हटले. प्रत्येक मंगलकार्याची सुरूवात गणेश पूजनापासून करण्याची आपली परंपरागत प्रथा आहे. तीच गणाच्या रूपाने तमाशात रूढझाली. तमाशाचा प्रत्येक खेळ निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून गणेशाला गणातून नमन केले जाते.

**गौळण**– तमाशात गणानंतर गौळण सादर होते. या गौळणीचे मूळ ज्ञानेश्वरांपर्यंत जाऊन पोचते. त्यांनीही आध्यात्मिक गौळणी लिहिल्या आहेत. तमाशात मात्र आध्यात्मातूनही शृंगार दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. श्रीकृष्ण मथूरेला जाणाऱ्या गौळणींना अडवतो. मग गौळणी आणि मावशीसोबत कृष्णाचा खटकेबाज संवाद होतो. हे चटकदार संवाद पूर्णपणे करमणूकप्रधान असतात. सर्व गौळणी व मावशी कृष्णाची विनवणी करतात. शेवटी कृष्ण आपले अस्सल दान म्हणजे तमाशातील गौळण मिळाल्यानंतर सर्व गौळणींना जाण्याची अनुज्ञा देतो आणि गौळण संपते.

**लावणी**– लावणी हा तमाशातील अत्यंत लोकप्रिय प्रकार लावणीचा संबंध काहीजन संस्कृतमधील लापणिकेशी जोडतात. तर काही शेतीमधील भाताच्या रोपाच्या लावणीशी जोडतात. पण लावणी समूह मनाचे रंजन करण्यासाठी जन्मल्याचे प्रचलित आहे. हा मुलतः गेय काव्यप्रकार आहे. लावणी रचना बव्हांशी आठ मात्रांच्या पद्मावर्तनी व क्वचित सहा मात्रांच्या भृंगावर्तनी वृत्तात म्हणजे तालगेय जाती वृत्रात असते. लावणीच्या गायनात कडे, ढोलके, टाळ, तुणतूणे, खंजिरी यांची साथ असते. महार लोक लांब हरळी देउन उंच खडया आवाजात विशिष्ट प्रकारची ढबीत लावणी म्हणतात. या लावणीला महारी लावणी असे म्हणतात. याच लावणीतून फडाच्या लावणीचा जन्म झाला असावा. स्थूलपणे या लावण्यांची तीन प्रकारात विभागणी करता येते. 1. शाहिरी किंवा भेदिक लावणी 2. बैठकीची लावणी 3. तमाशाची किंवा फडाची लावणी, या लावण्यांचे स्त्री पुरूष सौंदर्य वर्णनपर, शृंगार, विरह, वियोग, रूसवे फुगवे असे अनेक विषय असतात. त्याचबरोबर पौराणिक, आध्यात्मिक, सामाजिक, काल्पनिक अशा अनेक विविध

विषयांवर लावण्या रचतात. संत एकनाथकालीन मन्मथस्वामी यांनी रचलेली 'कराड क्षेत्रवर्णन' करणारी लावणी सर्वात जुनी लावणी मानली जाते.

**दौलतज्यादा**— तमाशाचा राजाश्रय गेल्यानंतर तो लोकाश्रयाला आला. आजही गावच्या जत्रेसाठी वर्गणी गोळाकरून लोकवर्गणीतून तमाशा आणला जातो. अशी बिदागी किंवा बक्षीस देणाऱ्यांची संपत्ती वाढावी या उद्देशाने 'दौलतज्यादा' हा शब्द वापरण्यात येत होता. पण नंतर या प्रकाराला हिडीस रूप प्राप्त झाले. यातच लावणी तोडणे हा ही प्रकार सुरू झाला. त्यामूळे तमाशावर बंदी घालण्यापर्यंत वेळ आली होती.

**रंगबाजी**— उत्तान शृंगार चेष्टांचे वर्णन करणारी गाणी तसेच नाची व सोंगाडया यांचा खटकेबाज संवाद याचा अंतर्भाव रंगबाजीमध्ये होतो.

**छक्कड**— छक्कड म्हणजे पद्यमय संवाद पठ्ठेबापुरावांनी या प्रकाराला विशेष लोकप्रियता प्राप्त करून दिली. मात्र संवाद फेकीवर याची परिणामकारकता अवलंबून असते.

**फार्स**— यालाच बतावणी, संपादणी असेही संबोधतात. तमाशातील फार्समध्ये बहुतांश तात्या आणि बापू ही दोन पात्रे असतात. पुढे सादर होणाऱ्या वगातील पात्रांची रंगरंगोटी होईपर्यंतच्या वेळात बतावणीचे सादरीकरण होत असते. तात्या आणि बापू दोघे विनोदासाठी चुटक्यांचे किंवा शापांचे सहाय्य घेवून प्रेक्षकांना हसवितात.

**संगीतबारी**— 1930 नंतरच्या काळात उत्तर हिंदूस्थानी जलशाच्या पध्दतीचा एक नवाच प्रकार विदर्भ मराठवाडयातून येऊन तमाशात मिसळला. हा मूळचा तमाशा नसून तो डोंबारणी, कोल्हाटी यांचा नाच होय. आज सादर होणारे लावण्याचे कार्यक्रम म्हणजे संगीतबारीचाच प्रकार म्हणावयास हरकत नाही अलिकडे हिंदी मराठी चित्रपटातील गाणी उगाचच इकडून तिकडे पळत गेल्यागत नाचून म्हणणे असे या संगीत बारीचे मुळचे स्वरूप आहे.

**वग**— हा शब्द 'ओघ' शब्दाचा अपभ्रंश असावा. तमाशातील नाटय खऱ्या अर्थाने वगामध्ये पहावयास मिळते. सातवाहन राजा हाल याच्या 'गाथासप्तशती' या ग्रंथामध्ये 'वग्ग' हा शब्द कळप, समूह या अर्थाने वापरल्याचे दिसते. वगाचे स्वरूप हे नाटकाप्रमाणेच असते. संवाद, पात्रे, नाटकाप्रमाणेच असतात. कथा ठरलेली असते. पण प्रत्येक पात्राच्या तोंडचे संवाद मात्र स्वयंस्फूर्तीने किंवा हजरजबाबीपणाने अभिव्यक्त होतात. तमाशाचा उत्तरार्ध म्हणजे वग. वगाची संहिता लिखीत नसते. सरदार किंवा तमाशाचा प्रमूख संवादामध्ये सुसूत्रता राखून कथेला गती प्राप्त करून देत असतो. विमुक्त संवाद, अभिनय, नृत्य, संगीत यांच्या माध्यमातून वगाचा प्रयोग सिध्द होतो. वग सादर होण्यापूर्वी कटाव किंवा शिलकारा म्हणजे पुढे सादर होणाऱ्या वगाचे थोडक्यात कथानक सांगणारी लहानशी लावणी सादर केली जाते. तिला टाकणीची लावणी किंवा वगाची लावणी असे ही म्हटले जाते. वगाचा विषय कोणताही असो. जर त्यामध्ये राजा, राणी, सरदार, शिलेदार, कोतवाल, शिपाई अशी पात्रे असल्यास त्याला 'रजवाडी वग' असे म्हणतात. आशयानुसार वगाचे गंभीर वग आणि रंजक वग असेही प्रकार पडतात. परंपरेने उमाजी सावळजकर आणि बाबा मांग यांचा 'मोहना बटाव' हा पहिला वग मानला जातो. तर डॉ विश्वनाथ शिंदेंच्या मते, सगनभाऊंचा 'कस्तुरी सुंगध' हा पहिला वग होय.

उत्तरपेशवाई आणि साधारणतः 1930 पर्यंतचा काळ तमाशाच्या भरभराटीचा काळ होता. नंतर मात्र तमाशाला उतरती कळा लागली. अश्लिलतेच्या सबबीखाली तमाशाबवर बंदी आणण्यात आली. परंतु तमाशाची लोकप्रियता व रंजन सामर्थ्य लक्षात घेवून 1948 साली शासनाने तमाशा सुधार समिती नेमली. या समितीने आणि महाराष्ट्र तमाशा परिषदने तमाशातील अनिष्ठ प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला आणि तमाशा लोकनाटय तमाशा म्हणून लोकांपुढे आला. पुढे या तमाशातून जलसा, कलापथके निर्माण झाली व त्यांनी रंजनातून समाज प्रबोधन, लोकशिक्षण इ. गोष्टी नजरेसमोर ठेऊन सादरीकरण केले. रंजनातून प्रबोधन साध्य झाले.

पूर्वी गण, गौळण, लावणी, दौलतज्यादा, रंगबाजी, छक्कड, फार्स बतावणी, संगीतबारी आणि वग या विविध अंगांनी तमाशा ही लोककला आविष्कृत होत असे. पण आज मात्र गण, गौळण, बतावणी लावण्यांच्या नावाखाली चित्रपटातील गाणी आणि वग सादर होताना दिसतो. कधी कधी या वगाचे सादरीकरणही होत नाही. आज महाराष्ट्राच्या या समृध्द लोककलेचे ऑर्केस्ट्रात रूपांतर झाले आहे.

**संदर्भ**

1 मराठी विश्वकोश खंड, 15 पृष्ठ — 693, 694
2 व्हटकर नामदेव, मराठीचे लोकनाटय तमाशा : कला आणि साहित्य,अजब प्रकाशन,डिसें 2009
3 मराठी विश्वकोश खंड, 7 पृष्ठ — 157, 158
4 सबनीस वसंत, विच्छा माझी एक आठवण पर्व, परचुरे प्रकाशन मंदिर, 1999